E/Sujay/ circular Marathi/ PA

# मुंबई विद्यापीठ

क्र.संलग्नता/आयसीसी/(२०२५—२६)/२५/२०२५

## परिपत्रक:

विषय: महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये एच. आय. व्ही./एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालय तिथे आरआरसी उपक्रमांतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबत...

संदर्भ: सचिव १, सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन, नवीन मंत्रालय, मुंबई यांचे क्र. मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५—२६/४६४९—८१, दिनांक १६/०९/२०२५ रोजीचे परिपत्रक.

उपरोक्त संदर्भाधिन विषयान्वये मुंबई विद्यापीठ संलग्नित/स्वायत्त महाविद्यालयांचे संचालक/प्राचार्य मान्यताप्राप्त संस्थांचे संचालक, विद्यापीठाच्या विविध विभागाचे संचालक/प्रमुख यांना उक्त संदर्भिय कळविण्यात येते की, एड्सवर पूर्णत्वाने मात करणे करीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरीता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांच्या दरम्यान आलेल्या अनुभवावरून एनएसीपी V चा कालावधी (सन २०२१—२०२६) अर्थात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा पाचवा टप्पा तयार करण्यात आला आहे. कार्यक्रमाची रचना, त्याची उद्दिष्टे अंमलबजावणीचे प्राधान्यक्रम आदी सर्व गोष्टी ठरवितांना विविध स्तरावर व्यापक प्रमाणात सल्लामसलत करण्यात आली आहे. वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तीच्या संघटना, संशोधक, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सर्वांबरोबर सर्वसमावेशक असा हा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

नॅको, नवी दिल्ली याच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये प्रौढ (१५ ते ४९) वयाच्या लोकांमध्ये एचआयव्ही चा प्रादुर्भाव हा ०.२९% इतका आहे. तसेच एचआयव्ही/एड्स बद्दल व्यापक ज्ञान असलेले तरूण (१५ ते २४ ) वर्ष यांचे प्रमाणे फक्त ३७% इतके आहे. महाराष्ट्रात तरूणांमध्ये (१५ ते २४) वर्ष एचआयव्हीचा भार १८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्रात तरूणांमध्ये (१५ ते २४) वर्ष दरवर्षी हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रूग्ण सापडत आहेत. युवक युवतींमध्ये एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य करण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्कारण्याची बिनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांच्यामध्ये संसर्ग होण्याची शक्यता इतरांपेक्षा अधिक असते.

E/Sujay/ circular Marathi/ PA

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मराएनिसं) द्वारे रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थिनीपर्यंत एचआयव्ही/एड्स विषयी जन जागृती करण्यात येते. महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैगिक वर्तन अधिक जबाबदार बनविणे, रक्तदानाचे महत्व विशद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये सन २०१० पासून आतापर्यंत ९३२ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये महाविद्यालयीन युवकांचा सहभाग असतो. रेड रिबन क्लब मार्फत त्याच्या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये (एनएसएस) एचआयव्ही/एड्स जनजागृतीकरीता विशेष प्राधान्य दिले तर एनएसएसद्वारे आयोजित उपक्रमामध्ये आणि कॅम्पच्या ठिकाणी त्यांच्याद्वारे व्यापक व प्रभावी जनजागृती होईल.

जागतिक एड्स दिन (०१ डिसेंबर) रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयांत एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीचे कार्यक्रम होतात. परंतु फक्त जागतिक एड्स दिनाच्या कार्यक्रमापर्यंत मर्यादित न राहता, मराएनिसंकडून आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट) व राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) साजरा करून युवांमध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच जिल्हा सामान्य रूग्णालय येथे असलेल्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष (डापकू) यांचे मार्फत महाविद्यालयात जाऊन संवेदीकरण करण्यात येते.

त्याअनुषंगाने महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) मध्ये रेड रिबन क्लबच्या उपक्रमाचा समावेश करावा. तसेच ज्या महाविद्यालयात एनएसएस नाही त्या महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक एड्स दिन तसेच वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करण्यात यावी. जेणेकरून विद्यार्थी—विद्यार्थीनींमध्ये एचआयव्ही/एड्स, गुप्तरोग/प्रजनन मार्गातील संसर्ग (STI/RTI) हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिबंध कसा करावा याबद्दल संपूर्ण माहिती होईल.

एचआयव्ही/एड्स आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरीता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नवीन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरीता महाविद्यालय तिथे रेड रिबन क्लब स्थापन करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्याबाबत सुचित करण्यात येत आहे.

मुंबई—४०० ०३२
03 ऑक्टोबर, २०२५

(डॉ. प्रसाद कारंडे)
कुलसचिव

प्रत:—

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये मुंबई विद्यापीठाशी संलग्नीत सर्व शासकिय, अशासकिय, अनुदानित, विनाअनुदानित, कायम विनाअनुदानित पदव्युत्तर पदवी, पदवी महाविद्यालयांचे प्राचार्य, संस्थाचे संचालक यांना.

महाराष्ट्र शासन
सार्वजनिक आरोग्य विभाग
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल इमारत,
१० वा मजला, नवीन मंत्रालय, मुंबई-०१.

---

जा.क्र: मराएनिसं/माशिसं/आरआरसी/२५-२६/4649-81 | दिनांक-१६/०९/२०२५

प्रति,

१) मा. अप्पर मुख्य सचिव उच्च व तंत्रशिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई.

२) मा. अप्पर मुख्य सचिव, कौशल्य, रोजगार, उद्योजकता आणि नवोन्मेष विभाग, मंत्रालय, मुंबई.

३) मा. सचिव वैद्यकीय शिक्षण आणि औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.

४) कुलसचिव, सर्व विद्यापीठे, महाराष्ट्र राज्य.

५) जिल्हाधिकारी, (सर्व)

**विषयः महाराष्ट्रातील सर्व विद्यापीठांमध्ये व संलग्न महाविद्यालयांमध्ये एच.आय.व्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यासाठी महाविद्यालय तिथे आरआरसी उपक्रमांतर्गत रेड रिबन क्लब स्थापन करण्याबाबत.**

महोदय,

एड्सवर पूर्णत्वाने मात करणे करीता कोणतेही औषध वा लस अद्यापी उपलब्ध नसल्यामुळे या रोगाला प्रतिबंध करणे हाच एकमेव उपाय सध्या उपलब्ध आहे. या आजारावर नियंत्रण मिळविण्यासाठी भारतात केंद्र शासन पुरस्कृत राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रम सन १९९२ पासून राबविण्यात येत आहे. राज्यात एड्स नियंत्रण कार्यक्रमाची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्याकरिता महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण सोसायटीची स्थापना माहे जुलै १९९८ मध्ये करण्यात आलेली आहे.

राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाच्या पहिल्या, दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या टप्प्यांच्या दरम्यान आलेल्या अनुभवावरुन एनएसीपी V वा कालावधी (सन २०२१-२०२६) अर्थात राष्ट्रीय एड्स नियंत्रण कार्यक्रमाचा पाचवा टप्पा तयार करण्यात आला आहे. कार्यक्रमाची रचना, त्याची उद्दिष्टे, अंमलबजावणीचे प्राधान्यक्रम आदी सर्व गोष्टी ठरविताना विविध स्तरावर व्यापक प्रमाणात सल्लामसलत करण्यात आली आहे. वैद्यकिय क्षेत्रातील तज्ञ, अशासकीय संस्थांचे प्रतिनिधी, एचआयव्हीसह जगणाऱ्या व्यक्तींच्या संघटना, संशोधक, सार्वजनिक व खाजगी क्षेत्रातील मान्यवर व्यक्ती या सर्वांबरोबर सर्वसमावेशक असा हा कृती कार्यक्रम तयार करण्यात आला आहे.

नॅको, नवी दिल्ली यांच्या माहितीनुसार महाराष्ट्रामध्ये प्रौढ (१५ ते ४९) वयाच्या लोकांमध्ये एचआयव्ही चा प्रदुर्भाव हा ०.२९% इतका आहे. तसेच एचआयव्ही/एड्स बद्दल व्यापक ज्ञान असलेले तरुण (१५ ते २४ वर्षे) यांचे प्रमाण फक्त ३७% इतके आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४) वर्ष एचआयव्हीचा भार १८ हजारांहून अधिक आहे. महाराष्ट्रात तरुणांमध्ये (१५ ते २४ वर्ष) दरवर्षी हजारांहून अधिक नवीन एचआयव्हीचे रुग्ण सापडत आहेत. युवक

युवतीमध्ये एचआयव्हीचा संसर्ग होण्याचा जास्त धोका आहे. याचे मुख्य कारण म्हणजे युवकांची ऊर्जा, उत्साह आणि धोका पत्करण्याची/बिनधास्त वर्तणूक असल्यामुळे त्यांच्यामध्ये संसर्ग होण्याची शक्यता इतरांपेक्षा अधिक असते.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था (मसाएनिसं) द्वारे रेड रिबन क्लब मार्फत महाविद्यालयातील विद्यार्थी-विद्यार्थिनींपर्यंत एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृती करण्यात येते. महाविद्यालयातील युवकांना एचआयव्हीबाबत माहिती देणे, लैंगिक वर्तन अधिक जबाबदार बनविणे, रक्तदानाचे महत्त्व विशद करणे आणि अधिक निरोगी वातावरण तयार करणे यासाठी राज्यातील महाविद्यालयांमध्ये सन २०१० पासून आतापर्यंत १३२ रेड रिबन क्लब स्थापन केलेले आहेत. रेड रिबन क्लब मार्फत वर्षभर जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. त्यामध्ये महाविद्यालयीन युवकांचा सहभाग असतो. रेड रिबन क्लब मार्फत त्यांच्या महाविद्यालयातील इतर विद्यार्थ्यांमध्ये जनजागृती करण्यात येते तसेच त्यांच्याद्वारे इतर विविध जनजागृती उपक्रम राबविण्यात येतात. (राष्ट्रीय सेवा योजना उपक्रमामध्ये (एनएसएस) एच१आयव्ही/एड्स जनजागृतीकरिता विशेष प्राधान्य दिले तर एनएसएसद्वारे आयोजित उपक्रमामध्ये आणि कॅम्पच्या ठिकाणी त्यांच्याद्वारे व्यापक व प्रभावी जनजागृती होईल.)

जागतिक एड्स दिन (०१ डिसेंबर) रोजी विद्यापीठ आणि महाविद्यालयात एचआयव्ही/एड्स विषयी जनजागृतीचे कार्यक्रम होतात. परंतु फक्त जागतिक एड्स दिनाच्या कार्यक्रमापर्यंत मर्यादित न राहता, मराएनिसंकडून आंतरराष्ट्रीय युवा दिन (१२ ऑगस्ट) व राष्ट्रीय युवा दिन (१२ जानेवारी) साजरा करुन युवामध्ये जनजागृती करण्यात येते. तसेच जिल्हा सामान्य रुग्णालय येथे असलेल्या जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण कक्ष (डापकू) यांच्या मार्फत महाविद्यालयात जाऊन संवेदीकरण करण्यात येते.

आपल्या अंतर्गत असलेल्या सर्व विद्यापीठ व महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजना (एनएसएस) मध्ये रेड रिबन क्लबच्या उपक्रमाचा समावेश करावा. तसेच ज्या महाविद्यालयात एनएसएस नाही त्या महाविद्यालयांना आंतरराष्ट्रीय युवा दिन व राष्ट्रीय युवा दिन आणि जागतिक एड्स दिन तसेच वर्षभर विविध उपक्रमाच्या माध्यमातून एचआयव्ही/एड्स बाबत जनजागृती करण्यात यावी. जेणेकरुन विद्यार्थी-विद्यार्थीनीमध्ये एचआयव्ही/एड्स, गुप्तरोग / प्रजनन मार्गातील संसर्ग (STI/RTI) हे आजार कसे होतात व कसे होत नाहीत तसेच आजाराला प्रतिबंध कसा करावा याबद्दल संपूर्ण माहिती होईल.

एचआयव्ही/एड्स आजाराचे देश व राज्यातून उच्चाटन करण्याकरिता आपल्या सहकार्याने येणाऱ्या नवीन पिढीला एचआयव्ही संसर्ग मुक्त करण्याकरिता महाविद्यालय तिथे रेड रिबन क्लब स्थापन करण्यासाठी आपल्या अधिनस्त अधिकाऱ्यांना कृपया सूचित करावे, ही विनंती.

आपला विश्वासू

डॉ. निपुण विनायक
सचिव - १
सार्वजनिक आरोग्य विभाग